INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION

August 2021 E-ISSN : 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

International E-Research Journal

Peer Reviewed, Referred & Indexed Journal

Special Issue 272

## उदारीकरणानंतरचा भारत १९९१-२०२१



**विशेषांक संपादक :**
संदीप तुंडूरवार
राज्यशास्त्र विभाग प्रमुख,
श्री बिंझाणी नगर महाविद्यालय, नागपूर
डॉ. शरद सांबारे
यशोदा गर्ल्स आर्ट्स अँन्ड कॉमर्स कॉलेज, नागपूर

**विशेषांक सहसंपादक :**
डॉ. दिनकर चौधरी
डॉ. अमर बोंदरे
डॉ. बाळासाहेब जोगदंड
डॉ. बबीता सिंग
डॉ. संतोष डाखरे

**मुख्य संपादक :**
डॉ. धनराज धनगर

**विशेष सहाय्य :**
प्रा. भास्कर वघाळे

For Details Visit To : www.researchjourney.net

SWATIDHAN PUBLICATIONS

E-ISSN : 2348-7143
August - 2021

August-2021 E-ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

International E-Research Journal

**PEER REFEREED & INDEXED JOURNAL**

**Special Issue 272**

# उदारीकरणानंतरचा भारत १९९१-२०२१

विशेषांक संपादक :
संदीप तुंडूरवार
राज्यशास्त्र विभाग प्रमुख,
श्री बिंझाणी नगर महाविद्यालय, नागपूर
डॉ. शरद सांबारे
यशोदा गर्ल्स आर्ट्स अँन्ड कॉमर्स कॉलेज, नागपूर

मुख्य संपादक :
डॉ. धनराज धनगर

विशेषांक सहसंपादक
डॉ. दिनकर चौधरी
डॉ. अमर बोंदरे
डॉ. बाळासाहेब जोगदंड
डॉ. बबीता सिंग
डॉ. संतोष डाखरे

विशेष सहाय्य :
प्रा. भास्कर वघाळे

RESEARCH JOURNEY

*Our Editors have reviewed papers with experts' committee, and they have checked the papers on their level best to stop furtive literature. Except it, the respective authors of the papers are responsible for originality of the papers and intensive thoughts in the papers. Nobody can republish these papers without pre-permission of the publisher.*

***- Chief & Executive Editor***

SWATIDHAN INTERNATIONAL PUBLICATIONS
For Details Visit To : **www.researchjourney.net**

*Cover Photo (Source) : Internet

© All rights reserved with the authors & publisher

Price : Rs. 1000/-

E-ISSN : 2348-7143
August - 2021

# अनुक्रमणिका


| अ.नं. | शीर्षक | लेखक /लेखिका | पृ. क्र. |
|---|---|---|---|
| 1 | उदारीकरणानंतरचा भारत | श्री. अच्युत गोडबोले | 07 |
| 2 | उदारीकरणानंतरचा भारत १९९१-२०२१उदारीकरणातून उद्भवलेल्या समस्या-एक दृष्टिक्षेप | डॉ. अलका देशमुख | 16 |
| 3 | उदारीकरण-खासगीकरण- जागतिकीकरणः एक चिकित्सक अध्ययन | डॉ. सुभाष उपाते | 22 |
| 4 | उदारवादातून उदभवलेले प्रश्न, समस्या त्यावरील उपाय | डॉ. विनोद मुडे | 30 |
| 5 | 1991 ते 2021 या कालावधीतील भारतीय पंतप्रधानाची उदारीकरणाबाबतची भूमिका आणि त्यांचा दृष्टीकोन | डॉ. राहुल खरात | 35 |
| 6 | भारतीय लोकशाही आणि जागतिकीकरण | प्रा. हरीषकुमार किनकर | 46 |
| 7 | पी. व्ही. नरसिंहराव यांचे नेतृत्व आणि भारतातील उदारवादाचा प्रारंभ | डॉ. नरेंद्र ई. घरत, डॉ. भुपेन्द्र ई. घरत | 51 |
| 8 | पी. व्ही. नरसिंहरावांचे नेतृत्व व उदारीकरण | डॉ. ज्योती कवठे | 55 |
| 9 | पी. व्ही. नरसिंहराव यांचे उदारीकरणाचे धोरण आणि लोककल्याणकारी लोकशाहीबाबतची भूमिका | प्रा. भास्कर वघाळे, डॉ. रायन महाजन | 61 |
| 10 | पी. व्ही. नरसिंहराव यांचे नेतृत्व आणि भारतातील उदारवादाचा प्रारंभ | डॉ. सुशांत चिमणकर | 66 |
| 11 | पी. व्ही. नरसिंहराव यांचे नेतृत्व आणि भारतातील उदारवादाचा प्रारंभ | प्रा. पुनम देशमुख | 73 |
| 12 | पी. व्ही. नरसिंहराव: भारतीय उदारीकरणाचे शिल्पकार | डॉ. नंदाजी सातपुते | 76 |
| 13 | पी. व्ही. नरसिंहराव: भारतीय आर्थिक उदारीकरणाचे प्रणेते | डॉ. संजय गोरे | 79 |
| 14 | 21 व्या शतकातील भारत आणि मोदीकालीन परराष्ट्र धोरणाची दिशा | डॉ. रतन राठोड | 82 |
| 15 | उदारीकरणामुळे भारताच्या परराष्ट्र धोरणात झालेला बदल | प्रा. तानाजी माने | 88 |
| 16 | उदारमतवाद: भारताच्या परराष्ट्र धोरणाचे सामर्थ्य | डॉ. वैशाली प्र. सुपेकर | 94 |
| 17 | उदारीकरणानंतरचे भारतीय संघराज्य | प्रा. डी. डी. ठाकरे | 97 |
| 18 | उदारीकरण आणि भारत | प्रा. लोमेश बावनकुळे | 103 |
| 19 | उदारीकरणानंतरची जागतिक व भारतीय लोकशाही | डॉ. सुनंदा अ. राऊत | 107 |
| 20 | भारतातील उदारवादाची वाटचाल | डॉ. संतोष सं. डाखरे | 113 |
| 21 | उदारमतवाद अर्थ, मुलतत्वे आणि उदारमतवादाचे नवस्वरूप व मूल्यमापन | डॉ.विलास टाले | 118 |
| 22 | राजकीय पक्षांच्या विचारधारा आणि उदारवादी भारत | प्रा. लालचंद मेश्राम | 124 |
| 23 | भारतातील उदारीकरण आणि व्यवस्थेतील बदलते प्रवाह | डॉ. अमर बोंदरे | 127 |
| 24 | 21 व्या शतकातील उदारमतवादी धोरण | डॉ. कल्पना आर. टेकाडे | 132 |
| 25 | कोरोना परिस्थितीतील आरोग्य व्यवस्थेसह सार्वजनिक संस्थांचा उदारवाद | डॉ. विनोद गायकवाड | 137 |
| 26 | उदारीकरणाचा भारतीय शेतीवरील परिणाम | डॉ. अमित पांडे | 142 |
| 27 | उदारीकरणानंतरचा भारत (१९९१-२०२१) | डॉ. मारोती घंटेवाड | 147 |
| 28 | उदारीकरणानंतर भारतातील उच्च शिक्षणापुढील अव्हाने आणि जागतिक स्पर्धा | डॉ. सविता झुंजारे | 152 |
| 29 | उदारवादातून उद्धवलेले प्रश्न, समस्या व त्यावरील उपाय | डॉ. दिनकर चौधरी | 156 |

E-ISSN : 2348-7143
August - 2021

# उदारीकरणामुळे भारताच्या परराष्ट्र धोरणात झालेला बदल

**प्रा. तानाजी संभाजी माने**
लोकमान्य महाविद्यालय वरोरा, जी–चंद्रपुर

**सारांशः–**

भारताचे परराष्ट्र धोरण हे गतिशील राहिले आहे. जसे जसे भारताच्या राष्ट्रीय हितात आंतरराष्ट्रीय परिस्थितीच्या संदर्भात परिवर्तन झाले तस तसे भारताच्या परराष्ट्र धोरणाचे स्वरूप बदलत गेले. भारतीय राज्यव्यवस्थेला सर्वाधिक प्रभावित करणाऱ्या घटनांपैकी एक म्हणजे खाउजा धोरणाचा केलेला स्वीकार होय. ज्याप्रमाणे हे धोरण स्वीकारण्यासाठी तत्कालीन आंतरराष्ट्रीय आणि राष्ट्रीय परिस्थिती कारणीभूत ठरली, त्याचप्रमाणे हे धोरण भारतातील इतर क्षेत्राबरोबरच विदेशनीतितील बदलास कारणीभूत ठरले आहे. राव सरकारने देशाला भेडसावणा–या आर्थिक परिस्थितीतून मार्ग काढण्यासाठी आर्थिक उदारीकरणाचे धोरण स्वीकारले. या धोरणाचा देशांतर्गत परिस्थिती बरोबरच परराष्ट्र धोरणावर सुद्धा व्यापक परिणाम होणे सहाजिक होते. याचा महत्वपूर्ण परिणाम म्हणजे राव सरकारने परराष्ट्र धोरणाचे काही नवीन उद्दिष्टे निश्चित केले. त्यात प्रामुख्याने भारताच्या आर्थिक आणि व्यापारी हितसंबंधाचे रक्षण करणे, अमेरिकेसोबत संबंध सुधारणे इ. चा उल्लेख करता येईल.

नरसिंहराव यांच्या नंतर सत्तेवर आलेल्या इंद्रकुमार गुजराल, अटलबिहारी वाजपेयी, डॉ मनमोहन सिंग आणि नरेंद्र मोदी या पंतप्रधानांनी या उद्दिष्टात सातत्य ठेवत त्याचा विकास घडवून आणला. परिणामी आज परराष्ट्र धोरणाकडे आर्थिक हितसंबंध साध्य करण्याचे साधन म्हणून पहिले जात आहे. उदारीकरणामुळे व्यापार आणि परदेशी गुंतवणूक बाबत सुधारणा केल्याने भारताच्या आयात निर्यात व्यापारात वाढ होत आहे. उदारीकरणानंतर भारत–अमेरिका संबंधातही बदल झाले आहे व्यापार, ऊर्जा, सुरक्षा, दहशतवाद अश्या विविध विषयाच्या अनुषंगाने दोन्ही देशातील संबंध दृढ होताना दिसत आहे.

**मूळ संकल्पनाः–**

परराष्ट्र धोरण, उदारीकरण, आर्थिक हितसंबंध, व्यापारी हितसंबंध

**प्रस्तावनाः–**

कोणत्याही देशाच्या वाटचालीचा मागोवा घेतल्यास असे लक्षात येते की, त्या देशाच्या वाटचालीस प्रभावित करणाऱ्या काही घटना उल्लेख केला जातो. 1991 साली नरसिंहराव सरकारने स्वीकारलेल्या उदारीकरणाच्या धोरणाचा उल्लेख करता येईल. भारतावर आलेल्या आर्थिक विपत्तीचा सामना करण्यासाठी राव सरकारला जागतिक बँकेकडून कर्ज घेणे भाग पडले. हे कर्ज घेताना आंतराष्ट्रीय मुद्रा कोष आणि जागतिक बँकेने घातलेल्या अटी मान्य कराव्या लागल्या. यासंबंधी तत्कालीन पंतप्रधान नरसिंहराव यांनी मत मांडले की, "एप्रिल 1991 साली........आय.एम.एफ आणि जागतिक बँकेशी सल्लामसलत केली. त्या चर्चेचा अहवाल असा होता की, सुधारणा होईपर्यंत मदतीसाठी कोणतीही नवीन वचनबद्धता केली जाणार नाही". *(सीतापति:2016)* अर्थमंत्री मनमोहन सिंग यांनी नवीन आर्थिक धोरण असणारा अर्थसंकल्प संसदेत सादर केला. याचा महत्वपूर्ण परिणाम म्हणजे राव सरकारने भारताच्या आर्थिक आणि व्यापारी हितसंबंधाचे रक्षण करणे, अमेरिकेसोबत संबंध सुधारणे, असियान सारख्या व्यापारी संघाचे सदस्यत्व प्राप्त करण्यासाठी प्रयत्न करणे इ. परराष्ट्र धोरणाची काही नवीन उद्दिष्टे निश्चित केली.

त्यानंतर सत्तेवर आलेल्या रालोआ आणि संपुआ सरकारनेही परराष्ट्र धोरणात या उद्दिष्टांना प्राधान्य दिले. सी. राजमोहन यांनी 'द शेपीक ऑफ इंडियाज् न्यू फॉरेन पॉलिसी' या पुस्तकात शीतयुध्दोत्तर काळात भारतीय परराष्ट्र धोरणात झालेल्या पाच महत्त्वपूर्ण बदलाचा उल्लेख केला आहे. "समाजवादाकडून भांडवली समाजाच्या निर्मितीकडे होत असलेला प्रवास, आर्थिक हितसंबंधांना प्राधान्य, व्यक्तिगत हितसंबंधाचे रक्षण, पश्चिम विरोधी परराष्ट्र धोरणाचा त्याग आणि आदर्शवादापेक्षा वास्तवावर भर इत्यादी".*(देवळाणकर:2007)* एकंदरीत उदारीकरणानंतर भारताच्या परराष्ट्र धोरणाला एक नवीन आयाम तथा नवी दिशा प्राप्त झाल्याचे दिसून येते. प्रस्तुत शोधनिबंधात उदारीकरणानंतर भारतीय परराष्ट्र धोरणाच्या उद्दिष्टात आणि भारत–अमेरिका संबंधातील बदलांचा अभ्यास करण्याचा प्रयत्न केला आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे:–**

1. उदारीकरणानंतर भारतीय परराष्ट्र धोरणाच्या उद्दिष्टात झालेल्या बदलांचा अभ्यास करणे.
2. उदारीकरणानंतर भारत–अमेरिका संबंधातील बदलाचा अभ्यास करणे.

**संशोधनाची गृहीतकृत्ये:–**

1. उदारीकरणानंतर भारतीय परराष्ट्र धोरणाच्या उद्दिष्टात आर्थिक हितसंबंध आणि व्यापारी हितसंबंधाच्या रक्षणाला स्थान दिले आहे.
2. उदारीकरणानंतर भारत–अमेरिका संबंधात बदल झाला आहे.

**अध्ययन पद्धती:–**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी दुय्यम तथ्य संकलन तंत्राच्या आधारावर तथ्यांचे संकलन केले आहे. या अध्ययनासाठी उदारीकरणानंतरच्या भारताच्या परराष्ट्र धोरणाचा अभ्यास करण्यासाठी विश्लेषणात्मक, तुलनात्मक आणि गुणात्मक अध्ययन पद्धतीचा वापर केला आहे.

**तथ्यांचे विश्लेषणात्मक निर्वचन:–**

**i) उदारीकरण म्हणजे काय?:–**

परराष्ट्र धोरण म्हणजे राष्ट्रीय हित साध्य करण्याची प्रक्रिया होय. जागतिकीकरणाने परराष्ट्र धोरणाला प्रभावित केले आहे. उदारीकरण हे जागतिकीकरणाच्या प्रक्रियेतील एक साधन आहे. जेव्हा अर्थवस्थेवरील काही निर्बंध काढून टाकले जातात किंवा शिथिल केले जातात, अशा प्रणालीला उदारीकरण म्हणतात. ही एक अशी प्रक्रिया आहे की, ज्यात एका अत्यंत नियंत्रित अर्थव्यवस्थेचे परिवर्तन खुल्या अर्थव्यवस्थेत केले जाते. उदारीकरण ही जागतिकीकरणाला परस्पर पूरक असणारी प्रक्रिया आहे. "उदारीकरणात आयात–निर्यातीवरील निर्बंध काढले जातात, आर्थिक व्यवहारातील शासनाची भूमिका मर्यादित होते. ही प्रक्रिया उद्योग क्षेत्र परवाना मुक्त करणे, आयात निर्यातीवरील निर्बंध उटवणे, आयातीची प्रक्रिया सोपी करणे, खासगीकरणाला प्रोत्साहन देणे, शासनाकडून दिल्या जाणाऱ्या अनुदानावर मर्यादा इ. प्रमुख तत्वावर आधारित आहे." *(फडिया:2010)* एकंदरीत आर्थिक उदारीकरणाची प्रक्रिया ही मुक्त व्यापाराच्या उद्दिष्टांवर आधारित आहे आहे.

**ii) भारताचे परराष्ट्र धोरण आणि उदारीकरणाची प्रक्रिया:–**

**अ)** कोणत्याही देशाच्या परराष्ट्र धोरणाच्या मुख्य उद्दिष्टापैकी एक म्हणजे आर्थिक विकास साध्य करणे. सुरुवातीला भारताने हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी मिश्रित अर्थव्यवस्थेचा स्वीकार केला. त्यातल्या त्यात प्रारंभी परराष्ट्र धोरणावर पंडित नेहरूंचा प्रभाव असल्यामुळे समाजवादी विचारप्रणालीचा प्रभाव स्पष्टपणे दिसून येतो. शीतयुद्धकाळात भारताने परराष्ट्र धोरणात द्विपक्षीय संबंध

E-ISSN : 2348-7143
August - 2021

प्रस्थापित करताना पश्चिम युरोपपेक्षा व पूर्व युरोपला आणि अमेरिकेपेक्षा सो. रशियाला प्राधान्य दिले होते. मात्र 1970 ते 1991 हा काळ भारतातील राजकीय अस्थिरतेचा काळ म्हणून ओळखला जातो. कारण या काळात सत्तेवर वेगवेगळ्या पक्षांची सरकारे आली. त्यांचा कार्यकाल अल्प राहिल्याने आर्थिक धोरणे ही भिन्न होती. परिणामी या सरकारचे अर्थव्यवस्थेकडे दुर्लक्ष झाले आणि देशावर आर्थिक संकट ओढवले.

शीतयुद्ध काळातील भारताच्या परराष्ट्र धोरणामध्ये आर्थिक हितसंबंधापेक्षा राजकीय हितसंबंधाच्या रक्षणाला महत्त्व दिले जात होते. याचे एक महत्त्वपूर्ण उदाहरण म्हणून भारत–दक्षिण–पूर्व आशियाच्या संबंधाचे देता येईल. दक्षिण–पूर्व आशियाई राष्ट्रे ही अमेरिकेच्या प्रभावाखाली आहेत. या राजकीय कारणांमुळे भारताच्या परराष्ट्र धोरणामध्ये दक्षिण–पूर्व आशियाकडे दुर्लक्ष करण्यात आले होते. दक्षिण–पूर्व आशियातील काही राष्ट्रांनी एकत्र येऊन 1960च्या दशकात आशियान या व्यापारी संघाची स्थापना केली होती. प्रारंभी या व्यापारी संघाचे सदस्यत्व प्राप्त करण्याची संधी भारताला मिळाली होती. मात्र तत्कालीन भारताच्या नेतृत्वाने ही संधी नाकारली. मात्र भारताने उदारीकरणानंतर राजकीय हितसंबंधाचे रक्षणाऐवजी आर्थिक आणि व्यापारी हितसंबंधाच्या रक्षणाला आणि त्यासाठी आर्थिक राजनयाचा वापर करायला सुरुवात केली.

त्याचे उत्तम उदाहरण म्हणून भारताने स्वीकारलेल्या 'पूर्वेकडे पहा' या धोरणाचे देता येईल. "भारताच्या पूर्वेकडे पहा धोरणाला ठोस आर्थिक युक्तिवाद आहे. त्यात महत्त्वाचा आर्थिक भागीदार सो. युनियनचे पतन, भारताला ग्रासून टाकणारी आर्थिक मंदी आणि टाळता न येणारे जागतिकरणाचे तर्कशास्त्र यामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीने भारताला 1991 साली आपल्या आर्थिक स्थितीचा आढावा घेऊन सुधारणा करणे भाग पडले". *(सिकरी:2017).* या धोरणांतर्गत भारताने आशियातल्या इतर देशांमध्ये आर्थिक विकासाच्या संधी शोधण्यावर भर दिला. नरसिंहरावांनी व्यापारी संघाचे सदस्यत्व प्राप्त करण्यासाठी प्रयत्न करण्याचे उद्दिष्ट आपल्या परराष्ट्र धोरणात ठेवले. इंद्रकुमार गुजराल यांनी भारताच्या आर्थिक आणि व्यापारी हितसंबंधांच्या दृष्टीने दक्षिण–पूर्व आशियातील देशांचे महत्त्व लक्षात घेऊन या देशांसोबत संबंध सुधारण्यासाठी पूर्वेकडे पहा या धोरणाचा विकास केला. त्यानंतर पंतप्रधान वाजपेयी यांनी नरसिंहराव व गुजराल यांनी विकसित केलेले पूर्वेकडे पहाचे धोरण पुढे चालू ठेवले. त्यांनी दक्षिण–पूर्व आशियातील देशांत सोबत संबंध मजबूत करण्यासाठी विशेष प्रयत्न केले. वाजपेयी सरकारच्या काळात सिंगापूर, इंडोनेशिया, व्हिएतनाम तसेच मलेशिया, कंबोडिया, थायलंड या देशांसोबत संबंध मजबूत करण्याच्या हेतूने विविध स्वरूपाचे करार केले.

त्यानंतर सिंग सरकारने आर्थिक विकास, आर्थिक हितसंबंध आणि व्यापाराला आपल्या परराष्ट्र धोरणात प्राथमिकता देण्याचे निश्चित केले. पंतप्रधान सिंग यांनी परराष्ट्र धोरणाची सूत्रे मांडले की, "भविष्यातील परराष्ट्र धोरण हे भारतातील सामान्य नागरिकांच्या आर्थिक आकांक्षाचे आणि अपेक्षांचे प्रतिनिधित्व करणारे असेल......त्यामुळे भारत हा आर्थिक विकासाचा कार्यक्रम पुढे चालू ठेवेल आणि त्यासाठी परराष्ट्र धोरणाचा साधन म्हणून वापर करेल." *(देवळाणकर:2014)* या धोरणाचा एक भाग म्हणून डॉ. सिंग यांनी आशियान या व्यापारी संघाच्या सदस्य राष्ट्रांशी आपले संबंध वृद्धिंगत करण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर विद्यमान पंतप्रधान मोदींनी पूर्वेकडे पहा या धोरणाला चांगले स्वरूप देण्यासाठी आणि त्याची योग्य रीतीने अंमलबजावणी करण्यासाठी या धोरणाचे '□क्ट ईस्ट' असे रुपांतर केले. हे धोरण म्हणजे दक्षिण–पूर्व आशिया देशांसोबत आर्थिक,व्यापारी संबंध याबरोबर ऊर्जा व संरक्षण आदी क्षेत्रात भागीदारी करण्यास प्राधान्य देणे होय.

1991च्या नवीन आर्थिक धोरणांतर्गत विदेशी व्यापार धोरणात सुधारणा आणि परकीय गुंतवणुकीला आकर्षित करण्यासाठी विविध तरतुदी करण्यात आल्या. त्याचा असा परिणाम झाला की, भारताच्या आयात–निर्यात व्यापारात वाढ झाली. "2000 साली भारताचा एकूण व्यापार 103 अरब डॉलरचा (पैकी 42 अरब डॉलर निर्यात आणि 60 अरब डॉलर आयात) होता. तो 2019–20 मध्ये 787 अरब डॉलरचा व्यापार (पैकी 313 अरब डॉलर निर्यात आणि 437 अरब डॉलर आयात) होता." *(योजना:2020)* आजमितीस भारताच्या प्रमुख व्यापारी भागीदारी असणाऱ्या देशांत अमेरिका, युरोपीय संघ, संयुक्त अरब अमिरात, जर्मनी, सिंगापूर आणि ब्रिटनचा समावेश होतो. भारताचा वाढलेला आंतरराष्ट्रीय व्यापार वाढलेल्या आयात–निर्यातीच्या पार्श्वभूमीवर विद्यमान परराष्ट्र मंत्र्यांकडून परराष्ट्र मंत्रालयात बदल घडवून आणले जात आहेत. तसेच भारतातील 'मेक इन इंडिया', 'स्टार्ट अप इंडिया' यासारख्या महत्वकांक्षी प्रकल्पाच्या पूर्ततेसाठी परकीय देशांकडून निधी आणि आवश्यक तंत्रज्ञान घेण्यासाठी परराष्ट्र धोरणाचा साधन म्हणून वापर केला जात आहे. याच उद्देशाने भारताच्या विद्यमान पंतप्रधान आणि परराष्ट्रमंत्री विदेश दौरे करताना दिसतात.

**आ)** उदारीकरण आणि बदलते आंतरराष्ट्रीय परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर भारताच्या अमेरिकाविषयक धोरणात परिवर्तन झाल्याचे दिसून येते. शीतयुद्धकालीन उभय देशातील संबंध म्हणावे तितके मित्रत्वाचे नव्हते. काश्मीर समस्या, गोवा मुक्तीची समस्या, भारताचा अलिप्ततावाद, अमेरिका–पाकिस्तान मैत्री अश्या राजकीय प्रश्नावरून मतभेद होते. एकंदरीत दोन्ही लोकशाहीप्रधान असणाऱ्या या देशात सुरुवातीला विरोधात्मक आणि सहकार्यात्मक संबंध राहिले होते. स्टेन्ली हॉफमैननी दोन्ही देशाच्या संबंधाबाबत म्हटले की, "सर्व प्रमुख देशांमध्ये भारत हा असा देश आहे की, ज्या सोबत संयुक्त राज्य अमेरिकाचे संबंध संभ्रम निर्माण करणारे आहे." *(खन्ना.एवम् अरोडा:2010)* त्यांनी भारत–अमेरिका संबंधाला 'अमैत्रीपूर्ण मित्रांचे संबंध'असे संबोधले आहे. शीतयुद्धकाळात उभय देशातील संबंधात चढ–उतार झाल्याचे दिसून येते. अमेरिकेची काश्मीर प्रश्नाबाबत असलेली दुटप्पी भूमिका आणि पाकिस्तान धार्जिणेपणामुळे भारताने आपल्या परराष्ट्र धोरणात अलिप्ततावाद आणि अमेरिका विरोधाला 1990 पर्यंत स्थान दिले होते.

उदारीकरणामुळे अमेरिका सोबतच्या आर्थिक संबंधाचा विस्तार झाला, परिणामी भारत–अमेरिकेचे संबंध सुधारत गेले. याकरिता इतरही कारणे कारणीभूत ठरले आहेत. दहशतवादाचे मूळ पाकिस्तान असल्याचे स्पष्ट झाल्यानंतर अमेरिकेचे पाकिस्तान सोबत संबंध बिघडत गेले. अमेरिकेला चीनकडून आव्हान मिळू लागल्यामुळे भारताबरोबरच्या भागीदारीचे महत्त्व वाटू लागले. नरसिंहरावांच्या कार्यकाळात भारताचे परराष्ट्र धोरण हे अमेरिकेला पूरक अशीच राहिले होते. वाजपेयी सरकारच्या काळात भारत–अमेरिका संबंध मजबूत होण्यास खऱ्या अर्थाने सुरुवात झाली. भारताच्या आण्विक परीक्षणामुळे अमेरिका नाराज होती. मात्र मार्च 2000 मध्ये अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष बिल क्लिंटनने भारत दौरा केला, अमेरिकन राष्ट्राध्यक्षांनी 22 वर्षानंतर केलेला हा दौरा होता. त्यामुळे उभय देशांच्या संबंधातील परिवर्तनाला चालना मिळाली. याचे श्रेय निश्चितच अटलबिहारी वाजपेयी यांच्या नेतृत्वाला दिले जाते. या दौऱ्यामूळे भारत–अमेरिकेचे आर्थिक संबंध आणखी वृद्धिंगत झाले. रालोआ शासनाच्या काळात भारताने आपली पारंपरिक अलिप्ततावादी भूमिका पूर्णपणे सोडून अमेरिकाधार्जिणे धोरण स्वीकारायला सुरुवात केली. वाजपेयी सरकारच्या काळात उभय देशात केवळ आर्थिक आणि व्यापारी स्वरूपाचेच नाही तर संरक्षण क्षेत्रातील सहकाकार्याविषयी अनेक करार झाले.

संपुआ सरकारने वाजपेयी यांचे अमेरिका धोरण पुढे सुरू ठेवले. संपुआ सरकारातील परराष्ट्रमंत्री नटवर सिहांनी उभय देशातील संबंधाबाबत म्हटले की, "भारत–अमेरिकेतील संबंध हे

बहुमुखी राहिले आहेत.....विश्वातील मोठ्या लोकशाही असलेल्या दोन्ही देशांतील संबंधात स्थिरता आणि स्थायित्व असणे हे संपूर्ण विश्व समुदायाच्या हिताचे आहे." *(सिंह:2005)* जुलै 2005 मध्ये डॉ. सिंग यांनी अमेरिकेला भेट दिलीय ही भेट पूर्वीच्या कोणत्याही भारतीय पंतप्रधानाच्या भेटीपेक्षा महत्त्वाची मानली जाते. यामुळे उभय देशांच्या संबंधांना नवी दिशा मिळाली. 2006ला भारत–अमेरिका संबंधातील मैलाचा दगड संबोधला जाणारा अणुऊर्जा सहकार्य करार झाला. भारताच्या परराष्ट्र व संरक्षण धोरणावर व्यापक प्रभाव टाकणारा हा करार घडवून आणण्यात डॉ. मनमोहन सिंग यांचे महत्त्वपूर्ण योगदान राहिले आहे. बराक ओबामा अमेरिकेचे राष्ट्रपती झाल्यानंतर त्यांनी आपल्या आशिया खंडाविषयी धोरणात महत्त्वपूर्ण बदल केले. याच कालावधीत पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांनी केलेला अमेरिका दौरा हा उभय देशांच्या संबंधाला महत्त्वपूर्ण कलाटणी देणारा ठरला. अमेरिकेने भारताला 'घनिष्ठ संरक्षण सहकार्याचा' दर्जा दिला. असा दर्जा मिळणारे भारत हे आशियातील दुसरे राष्ट्र ठरले.

विद्यमान मोदी सरकार हे आर्थिक विकास आणि आर्थिक संबंधाच्या संरक्षणाच्या दृष्टीने परराष्ट्र धोरणाकडे पाहताना दिसते. त्याचाच एक भाग म्हणजे अमेरिका सोबतचे संबंध घनिष्ट करण्याला प्राधान्य देऊन त्या माध्यमातून उभय देशातील बरेचसे प्रश्न सोडवण्याचा आणि या संबंधांना नवा आयाम देण्याचा प्रयत्न केला जात आहे. उभय देशातील महत्त्वपूर्ण असलेला नागरी अणुकरार पूर्ण झाला. भारताला आण्विक पुरवठादार गटाचे सदस्यत्व मिळावे म्हणून अमेरिकेने समर्थन दिले होते. भारताला अमेरिकेच्या पाठिंब्यामुळे 'क्षेपणास्त्र तंत्रज्ञान नियंत्रण कायदा' (एम.टी.सी.आर) चे सदस्यत्व मिळाले. राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांच्या कार्यकाळात जाहीर करण्यात आलेल्या राष्ट्रीय सुरक्षा धोरणात प्रामुख्याने आशिया खंडामध्ये भारताला 'उदयमान सत्ता' म्हणून मान्यता दिली. "अलीकडच्या वर्षात भारत आणि अमेरिका यांच्यातील संबंधात विस्तार झाला आहे, हा विस्तार एक व्यापक जागतिक धोरणात्मक भागीदारी पर्यंत पोहोचला आहे........संरक्षण, सुरक्षा आणि दहशतवादाशी दोन हात करणे हे दोन्ही देशातील भागीदारीची महत्त्वाचे आधारस्तंभ आहेत." *(योजना:2020).* उभय देशातील संबंध खोलवर रुजले आहेत. भारताच्या अमेरिका विषयक धोरणाचे महत्त्वपूर्ण घटक म्हणून दोन्ही देशातील वाढता व्यापार व गुंतवणूक, संशोधन, विकास स्वास्थ संबंधी सेवा अंतरिक्ष क्षेत्रातील सहकार्य इत्यादीचा उल्लेख करता येईल.

भारताची उर्जेची गरज, विभागीय महासत्ता बनण्याचे स्वप्न, युनोच्या सुरक्षा परिषदेचे कायम सदस्यत्व मिळवण्याचा मुद्दा, दहशतवादाचे आव्हान, चीनच्या वाढत्या सामर्थ्याचे आव्हान, आर्थिक आणि व्यापारी फायदे अशा विविध कारणासाठी भारताला अमेरिकेच्या सहकार्याची गरज आहे. एकंदरीत उदारीकरण आणि नवीन विश्वरचनेत स्वतःला स्वतःला जुळवून घेताना अमेरिकेशी संबंध सुधारणे पासून झालेला संबंधाची व्याप्ती नागरी आण्विक ऊर्जा सहकार्य पासून ते आलीकडे करण्यात आलेल्या बेका (बेसिक एक्सचेंज अँड कोऑपरेशन एग्रीमेंट) करारापर्यंत वाढत गेली आहे.

**समारोपः–**

वरील विवेचनावरून लक्षात येते की, उदारीकरणानंतर भारताच्या परराष्ट्र धोरणात मूलभूत परिवर्तन घडवून आले. विशेषतः आर्थिक हितसंबंधाला परराष्ट्र धोरणाच्या उद्दिष्टात स्थान दिले. भारत–अमेरिका संबंध सातत्याने सुधारणा होत गेली. नरसिहरावानीं अमेरिकेशी संबंध सुधारण्याचे उद्दिष्ट ठेवले त्यानंतरच्या शासकांनी उभय देशातील संबंध मजबूत करण्याचा प्रयत्न केला.

**निष्कर्ष :–**

1) उदारीकरणानंतर भारताचे परराष्ट्र धोरण समाजावादाकडून आणि भांडवलवादाकडे झुकले आहे.

E-ISSN : 2348-7143
August - 2021

2) उदारीकरणानंतर भारतीय परराष्ट्र धोरणाच्या उद्दिष्टात आर्थिक हितसंबंध आणि व्यापारी हितसंबंध जोपासण्याला स्थान देण्यात आले.

3) उदारीकरणानंतर भारताच्या आयात–निर्यात वापरात वाढ झाली.

4) उदारीकरणानंतर भारताने अमेरिका विरोधी धोरणाचा त्याग केला आहे. भारत–अमेरिका संबंध वृद्धिंगत झाले.

**संदर्भ सूचीः–**


1. सीतापति, वि. भट्ट, नी. (अनु). (2016). आधा शेर : पी वी नरसिम्हा राव ने भारत को कैसे बदला. नई दिल्ली : ऑक्सफोर्ड युनिव्हर्सिटी प्रेस , पृष्ठ क्र. 109
2. देवळाणकर, शै. (2007). भारतीय परराष्ट्र धोरण : सातत्य आणि स्थित्यंतर. पूणे : प्रतिमा प्रकाशन, पृष्ठ क्र. 66
3. फडिया, बी.एल. (2010). आंतरराष्ट्रीय राजनिती : सिध्दांत एवं समकालीन राजनितीक मुद्दे. आगरा : साहित्य भवन पब्लिकशन्स, पृष्ठ क्र. 531
4. सिकरी, रा. (2017). भारताच्या परराष्ट्र धोरणाचा पुनर्विचार : आव्हाने आणि नीती. न्यू दिल्ली : सागे पब्लिकेशन्स, पृष्ठ क्र. 107
5. देवळाणकर, शै. (2014). भारत आणि जग : भारताचे परराष्ट्र धोरण आणि सुरक्षा संबंध. पूणे : सकाळ प्रकाशन, पृष्ठ क्र. 17
6. रवी, डी. (अक्टूबर 2020). भारत में व्यापार को लेकर कैसी नीति : आंतरराष्ट्रीय संबंध. योजना, विशेषांक, पृष्ठ क्र. 15.
7. खन्ना, व्हि. एन. एवम् अरोडा, लि. (2010). भारत की विदेशनिती. नई दिल्ली : विकास पब्लिशिंग हाऊस, पृष्ठ क्र. 333
8. सिंह, रा. (2005). भारत की विदेश निती. आविष्कार पब्लिशर्स जयपूर : डिस्ट्रीब्युटर्स, पृष्ठ क्र. 80
9. शृंगला, ह. (अक्टूबर 2020). वैश्विक महामारी के समय में भारत की विदेश नीति : आंतरराष्ट्रीय संबंध. योजना, विशेषांक, पृष्ठ क्र. 7.